# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

☎ २५६५६२३४ **Email : ropune@dtemaharashtra.gov.in**


जा. क्र. : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी/२०१८-१९/२०१८/ 4400 दिनांक : १३/१०/२०१८ 15 OCT 2018

प्रति
प्राचार्य
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व संस्था

विषय : आपले सरकार डी बी टी पोर्टल वरील महाराष्ट्र शासनाची शिष्यवृत्ती योजना २०१८-१९

संदर्भ : १. संचालनालयाचे पत्र क्रमांक १८/तंशिस/डी बी टी/२०१८/३६० दिनांक ११/१०/२०१८.
२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक तंशिविकापु/विवि/महाडिबीटी/२०१८/४३६९ दिनांक ११/१०/२०१८

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता महाराष्ट्र राज्य शासनाच्या योजनांसाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग (डी. आय. टी.) यांचेकडून आपले सरकार डी बी टी पोर्टल (संकेतस्थळ **http:mahadbtmahait.gov.in**) बनविण्यात आलेले आहे. त्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या खालील योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्तायोजना.
३. उच्च व व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेण-या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना (भाग-१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)

उपरोक्त योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने उपरोक्त संदर्भ क्र १ चे पत्रामध्ये मा संचालक यांनी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत आपणास या कार्यालयाचे संदर्भ पत्र क्र २ व्दारे कळविण्यात आलेले होते.

तथापी अनेक संस्थांनी विद्यार्थ्यांकडून ऑन लाईन अर्ज भरुन घेवून ते पडताळणी करुन पुढील कार्यवाहीसाठी या कार्यालयाकडे ऑनलाईन पाठविलेले नाहीत. त्या अनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यात येते की त्यांनी संदर्भ क्र २ चे पत्रामध्ये दिलेल्या निर्देशानुसार ऑन लाईन अर्ज भरुन त्यांची पडताळणी करुन पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज पुढील कार्यवाहीसाठी या कार्यालयाकडे ऑनलाईन पाठवावेत. **विद्यार्थ्यांनी ऑन लाईन अर्ज भरल्यानंतर सदर अर्जामध्ये परीक्षा शुल्क व शिक्षण शुल्क यांची रक्कम दर्शवित नसल्यास असे अर्ज संस्थांनी ऑनलाईन पुढे पाठवू नयेत.**

**सर्व विनाअनुदानीत संस्थाना कळविण्यात येते की संस्थांचे शिक्षण शुल्क शिल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी मंजूर केले किंवा कसे याची माहिती या कार्यालयाचे संकेतस्थळ www.ropune.org.in वर इंन्स्टिटयुट लॉगईन मध्ये दिनांक १६/१०/२०१८ पर्यत भरावी जेणे करुन ज्यासंस्थांचे शुल्क मंजूर झाले नाही अशा संस्थांचे शुल्क मंजूर करुन देण्याबाबत वरीष्ठ कार्यालयास विनंती करता येईल.**

प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत — प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.